Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र. **F**

# Paper-II
# EDUCATION

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ....................................

   (Name) ............................................

2. (Signature) ....................................

   (Name) ............................................

Seat No. [ | | | | | | ]
(In figures as in Admit Card)

Seat No. ........................................................
(In words)

OMR Sheet No. [ | | | | | | ]
(To be filled by the Candidate)

## DEC - 70213

**Time Allowed : 1¼ Hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **24** Number of Questions in this Booklet : **50**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **50** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-II will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **50** बहुपर्याय प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# Education

## Paper II

# शिक्षाशास्त्र

## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** This Paper contains **Fifty (50)** multiple choice questions, each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पन्नास (50)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. "Spiritual force of the teacher is based on the love for the students." This was said by .......................... .
   (A) Mahatma Gandhi
   (B) Rabindranath Tagore
   (C) Swami Vivekananda
   (D) Sri Aurobindo

2. According to .......................... 'education should be related to practical life'.
   (A) Mahatma Gandhi and Rabindranath Tagore
   (B) Rabindranath Tagore and Vivekananda
   (C) Sri Aurobindo and Mahatma Gandhi
   (D) Swami Vivekananda and Sri Aurobindo

1. ''विद्यार्थ्यांबद्दलच्या प्रेमावर शिक्षकाचे आध्यात्मिक बल अवलंबून असते.''
   असे .................... म्हटले आहे.
   (A) महात्मा गांधी
   (B) रविन्द्रनाथ टागोर
   (C) स्वामी विवेकानंद
   (D) श्री अरविंद

2. 'शिक्षणाचा संबंध प्रत्यक्ष जीवनाशी असावा' हे शिक्षणाचे सूत्र ........................ यांनी सांगीतले.
   (A) महात्मा गांधी आणि रविंद्रनाथ टागोर
   (B) रविंद्रनाथ टागोर आणि विवेकानंद
   (C) श्री अरविंद आणि म. गांधी
   (D) स्वामी विवेकानंद आणि श्री अरविंद

3. According to pragmatism, education means .......................... .

   (A) Self-realization

   (B) Reconstruction of experiences

   (C) Teaching-learning

   (D) Personality development

4. Teacher motivates students to learn types of plants by making groups of students. This method of teaching is based on .......................... .

   (A) Idealism

   (B) Realism

   (C) Pragmatism

   (D) Existentialism

3. कार्यवादानुसार शिक्षण म्हणजे ................ .

   (A) आत्मप्रचिती

   (B) अनुभवांची पुनर्रचना

   (C) अध्ययन व अध्यापन

   (D) व्यक्तिमत्त्व विकास

4. शिक्षक विद्यार्थ्यांचे गट करून त्यांना वनस्पतींच्या प्रकारांचे अध्ययन करण्यास प्रवृत्त करतात. अध्यापनाची ही पद्धती पुढील तत्त्वज्ञानावर आधारित आहे :

   (A) आदर्शवाद

   (B) वास्तववाद

   (C) कार्यवाद

   (D) अस्तित्ववाद

5. In 'Maktab' curriculum of Islamic education the following were included :

(A) Reading, Writing and Arithmetic

(B) Reading, Language and Geometry

(C) Writing, Language and Grammar

(D) Grammar, Arithmetic and Language

6. According to Adams what is the nature of education process ?

(A) Subjective

(B) Objective

(C) Subjective and objective

(D) Objective based

5. इस्लामिक शिक्षण पद्धतीच्या मक्ताब अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना पुढील गोष्टी शिकविल्या जात असत :

(A) वाचन, लिखाण व अंकगणित

(B) वाचन, भाषा व भूमिती

(C) लेखन, भाषा व व्याकरण

(D) व्याकरण, अंकगणित, व भाषा

6. ॲडम्सच्या मते शिक्षण ही कोणत्या स्वरूपाची प्रक्रिया आहे ?

(A) व्यक्तीनिष्ठ

(B) वस्तुनिष्ठ

(C) व्यक्तीनिष्ठ व वस्तुनिष्ठ

(D) हेतु प्रधान

7. Belief on creative knowledge is the assumption of ..................... .

(A) Existentialism

(B) Reconstructionism

(C) Pragmatism

(D) Positive Relativism

8. Which of the following is Rousseau's opinion ?

(A) Child is pure at birth and society improves it further

(B) Child is not pure at birth but society makes it good

(C) Child is pure at birth but society makes it bad

(D) Child is not good or bad at birth but society makes it good

7. 'सृजनात्मक ज्ञानावर विश्वास' हे .............. तत्त्वज्ञानाचे गृहितक आहे.

(A) अस्ति त्ववाद

(B) पुनर्रचनावाद

(C) कार्यवाद

(D) सकारात्मक सापेक्षतावाद

8. रूसोने पुढीलपैकी कोणते मत व्यक्त केले आहे ?

(A) मुल जन्मत:च चांगळे असते व समाज त्यास सुधारतो

(B) मुल जन्मत:च चांगळे नसते परंतु समाज त्यास चांगळे बनवतो

(C) मुल जन्मत:च चांगळे असते परंतु समाज त्यास बिघडवतो

(D) मुल जन्मत:च वाईट किंवा चांगळे नसते समाजाप्रमाणे ते घडते

9. Which of the following is *not* acceptable to existentialism ?
   (A) Intimate relation of students and teachers
   (B) Student-teacher interaction
   (C) Following of time table scrupulously
   (D) Individual differences among students

10. According to whom 'character building is an important aim of education ?
   (A) Swami Vivekananda
   (B) Rousseau
   (C) Maria Montessorie
   (D) Rabindranath Tagore

9. पुढीलपैकी कोणती बाब अस्तित्ववादास मान्य **नाही** ?
   (A) विद्यार्थी आणि शिक्षकांचे जिव्हाळ्याचे संबंध
   (B) विद्यार्थी-शिक्षक आंतरक्रिया
   (C) वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन
   (D) विद्यार्थ्यांमधील वैयक्तिक फरक

10. पुढीलपैकी कोणाच्या मतानुसार 'चारित्र्य निर्माण' हे शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे ?
   (A) स्वामी विवेकानंद
   (B) रूसो
   (C) मारिया मॉंटिसरी
   (D) रविन्द्रनाथ टागोर

11. "As everyone has right over air and water and these are available to all, in the same way education should also be available to all."

This was said by .......................... .

(A) Sri Aurobindo

(B) Swami Vivekananda

(C) Mahatma Gandhi

(D) Rabindranath Tagore

12. Which of the following is *not* an objective of Buddhist philosophy of education ?

(A) Teaching of religious principles

(B) Brahmacharya

(C) Help in attaining Nirvan

(D) Self control

11. ''ज्या प्रमाणे हवा व पाणी यावर सगल्यांचा अधिकार आहे व ते सर्वांना समानपणे मिळते. त्याचप्रमाणे शिक्षणसुद्धा सर्वांसाठी खुले असावे' असे .................... यांनी म्हटले होते.

(A) श्री अरविंद

(B) स्वामी विवेकानंद

(C) महात्मा गांधी

(D) रविन्द्रनाथ टागोर

12. बौद्ध तत्त्वज्ञानुसार पुढीलपैकी कोणते शिक्षणाचे उद्दिष्ट **नाही** ?

(A) धर्मविषयक तत्त्वांची शिकवण

(B) ब्रह्मचर्य

(C) निर्वाण प्राप्तीस सहाय्य

(D) आत्मसंयम

13. The communists believe in .......................... society.

(A) religionless

(B) casteless

(C) classless

(D) raceless

14. Secularism means .......................... .

(A) there is no place for religion in public life

(B) giving equal importance to all religions

(C) giving more importance to religions of minority

(D) giving more importance to religions of majority

13. साम्यवादी .......................... समाजरचनेवर विश्वास ठेवतात.

(A) धर्मविरहित

(B) जातविरहित

(C) वर्गविरहित

(D) वंशविरहित

14. धर्मनिरपेक्षता म्हणजे .......................... .

(A) सार्वजनिक जीवनात धर्माला स्थान नाही

(B) सर्वधर्मांना समान महत्त्व देणे

(C) अल्पसंख्यांकांच्या धर्माला अधिक महत्त्व देणे

(D) बहुसंख्यांकांच्या धर्माला अधिक महत्त्व देणे

15. "Adaptation, goal-attainment, integration and 'pattern maintenance' are four sets of problems with which social system should be coped." This was stated by .......................... .

(A) Auguste Comte

(B) Parsons

(C) George Pane

(D) Karl Marx

16. The scheme of Sarva Shiksha Abhiyan (SSA) was evolved from the recommendations of .......................... .

(A) National Education Policy 1986

(B) National Education Commission

(C) State Ministers' Conference 1998

(D) National Literacy Mission 1988

15. अनुकूलन, ध्येय प्राप्ती, एकात्मता आणि रचनाबंध टिकवून ठेवणे, या चार समस्या गटांशी सामाजिक संरचनेला जुळवून घ्यावे लागते'. हे ........................ यांनी म्हटले आहे.

(A) ऑगस्ट कॉम्टे

(B) पार्सन्स

(C) जॉर्ज पेन

(D) कार्ल मार्क्स

16. 'सर्व शिक्षा अभियान (SSA) या योजनेची निर्मिती ........................ च्या शिफारशीनुसार झाली.

(A) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986

(B) राष्ट्रीय शिक्षण आयोग

(C) राज्यमंत्री परिषद 1998

(D) राष्ट्रीय साक्षरता मिशन 1988

17. 'Welfare state' emphasizes on progress and development of all citizens." This is the main principle of .......................... .

(A) Communism

(B) Socialism

(C) Too Nationalism

(D) Fascism

18. .......................... is *not* a factor of social change.

(A) Technological development

(B) Biological change

(C) Tolerance

(D) Political change

17. 'कल्याणकारी राज्य हे सर्व नागरिकांच्या प्रगतीवर व विकासावर भर देते' हे .......................... चे मुख्य तत्त्व आहे.

(A) साम्यवाद

(B) समाजवाद

(C) अति राष्ट्रवाद

(D) फॅसिझम

18. .......................... हा सामाजिक परिवर्तनाचा घटक **नाही**.

(A) तांत्रिक विकास

(B) जैविक बदल

(C) सहनशिलता

(D) राजकीय बदल

19. The Pupil-teacher ratio suggested by Right to Education Act, 2009 is .......................... .

(A) 20 : 1

(B) 30 : 1

(C) 35 : 1

(D) 25 : 1

20. Emile Durkheim explained his revolutionary thoughts about Educational Sociology in .......................... book.

(A) A Sociology of Education

(B) Sociology and Social Life

(C) Sociological Foundations of Education

(D) The Rules of Sociological Methods

19. 'शिक्षणाधिकार कायदा 2009' मध्ये विद्यार्थी–शिक्षक प्रमाण .......................... इतके सुचविले आहे.

(A) 20 : 1

(B) 30 : 1

(C) 35 : 1

(D) 25 : 1

20. एमिल दरखिमने आपले शैक्षणिक समाजशास्त्रा– विषयीचे क्रांतीकारक विचार .......................... पुस्तकातून मांडले.

(A) ए सोशियालॉजी ऑफ एज्युकेशन

(B) सोशियालॉजी अॅण्ड सोशल लाईफ

(C) सोशियालॉजीकल फॉउंडेशन्स ऑफ एज्युकेशन

(D) दी रूल्स ऑफ सोशियालॉजीकल मेथड्स

21. The main characteristic of open University is .......................... .

(A) student can acquire two degrees at a time

(B) flexibility in selecting courses

(C) different examination system

(D) advanced teaching methods

22. The Navodaya Vidyalaya Scheme was started for .......................... .

(A) development of tribal students

(B) development of scheduled caste students

(C) urban area students' development

(D) rural area students' development

21. ........................ हे मुक्त विद्यापीठाचे मुख्य वैशिष्ट्ये आहे.

(A) विद्यार्थी एकावेळी दोन पदव्या प्राप्त करू शकतात

(B) अभ्यासक्रमांच्या निवडीमधील लवचिकता

(C) वेगळी परीक्षा पद्धती

(D) आधुनिक अध्यापन पद्धती

22. नवोदय विद्यालय योजना ........................ सुरू झाली.

(A) आदिवासी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी

(B) अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या विकासासाठी

(C) शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या विकासासाठी

(D) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या विकासासाठी

23. Dr. Sampurnanand Committee gave recommendations about ..................... .
   - (A) emotional integration in our society
   - (B) developing three language formula
   - (C) implementation of Adult Education Scheme in India
   - (D) reformation of evaluation system in India

24. The real aim of democracy is .......................... .
   - (A) development of people as per their capacities
   - (B) developing infrastructural facilities
   - (C) to open non-government organization
   - (D) to open educational institutes for all

23. डॉ. संपूर्णानंद समितीने ........................ याबाबत शिफारशी केल्या.
   - (A) आपल्या समाजातील भावनिक एकात्मता
   - (B) त्रिभाषा सूत्राचा विकास
   - (C) भारतात प्रौढ शिक्षण योजना राबविणेबाबत
   - (D) भारतात मूल्यमापन पद्धतीच्या पुनर्रचनेबाबत

24. लोकशाहीचे प्रमुख ध्येय ........................ हे आहे.
   - (A) लोकांचा त्यांच्या क्षमताप्रमाणे विकास करणे
   - (B) पायाभूत सुविधांचा विकास
   - (C) अशासकीय संघटना सुरू करणे
   - (D) सर्वांसाठी शिक्षणसंस्था सुरू करणे

25. White defining educational psychology Judd gives more importance to .......................... .

(A) Mind

(B) Teaching-learning process

(C) Application of Psychological principles

(D) Life-stages of development

26. Ramesh always crosses his teacher's views by using logical statements. He is at the .......................... stage.

(A) Pre-childhood

(B) Later childhood

(C) Adolescence

(D) Adult

25. शैक्षणिक मानसशास्त्राची व्याख्या करताना जड्ड ............................ ला अधिक महत्त्व देतात.

(A) मन

(B) अध्ययन-अध्यापन प्रक्रिया

(C) मानसशास्त्रीय तत्वांचे उपयोजन

(D) जीवनाच्या विकास अवस्था

26. रमेश त्याच्या तार्किक विधानांच्या साहाय्याने त्याच्या शिक्षकांच्या विचारांना विरोध करतो. तो ......................... या अवस्थेत आहे.

(A) पूर्व बाल्यावस्था

(B) उत्तर बाल्यावस्था

(C) कुमारावस्था

(D) प्रौढावस्था

27. If I = intelligence, G = general factor and S = specific factor, then

$$I = [(G + S_1) + (G + S_2) + (G + S_3) + \ldots\ldots (G + S_n)]$$

formula explains ............... theory of intelligence.

(A) Spearman's

(B) Thurston's

(C) Thomson's

(D) Guilford's

28. The last stage of Gagne's hierarchy of learning is .......................... .

(A) Concept learning

(B) Problem solving

(C) Multiple discrimination

(D) Principle learning

29. Behaviourists think that learning results from .......................... .

(A) intelligence

(B) use of rewards and punishments

(C) by virtue of inheritance

(D) making the most of one's competencies

27. जर I = बुद्धिमत्ता, G = सामान्य घटक आणि S = विशिष्ट घटक, तर :

$$I = [(G + S_1) + (G + S_2) + (G + S_3) + \ldots\ldots (G + S_n)]$$

सूत्र ......................... यांची बुद्धिमापन उपपत्ती स्पष्ट करते.

(A) स्पियरमन

(B) थर्स्टन

(C) थॉमसन

(D) गिलफर्ड

28. गॅनेच्या अध्ययन श्रेणीमध्ये ......................... ही शेवटची अवस्था आहे.

(A) संकल्पना अध्ययन

(B) समस्या निराकरण

(C) गुणीत भेदाभेदन

(D) तत्वांचे अध्ययन

29. वर्तनवाद्यांच्या मते अध्ययन ही .................. ची निष्पत्ती आहे.

(A) बुद्धिमत्ता

(B) पारितोषिक व शिक्षा यांचा उपयोग

(C) अनुवंशिक देणगी

(D) स्वक्षमतांचा जास्तीत जास्त उपयोग

30. When the teacher enters the classroom, the students stop being noisy. This is an example of .......................... .

(A) Omission learning

(B) Punishment learning

(C) Discriminatory omission learning

(D) Discriminatory punishment learning

31. .......................... activity is not appropriate to teach mentally retarded students.

(A) Introducing social skills

(B) Division of content into small parts

(C) Abstraction of content

(D) Help students learn self regulation

30. शिक्षक वर्गात आल्यावर विद्‌यार्थी वर्गातील गोंधळ बंद करतात हे उदाहरण .................... चे आहे.

(A) लोपन अध्ययन

(B) शिक्षा अध्ययन

(C) तौलनिक लोपन अध्ययन

(D) तौलनिक शिक्षा अध्ययन

31. ........................ कृती मतिमंद विद्‌यार्थ्यांना शिकविण्यासाठी समर्पक ठरत नाही.

(A) सामाजिक कौशल्यांची ओळख

(B) आशयाचे छोट्या घटकांमध्ये रूपांतर करणे

(C) आशयाचे अमूर्तिकरण करणे

(D) विद्यार्थ्यांना स्वनियमनास मदत करणे

32. Pradnya is a gifted 4th standard student. She will complete both 4th and 5th standard curriculum this year. Pradnya's school is using .......................... program for gifted students.

(A) Enrichment curriculum

(B) Acceleration

(C) Curriculum compacting

(D) Ability grouping

33. One of the characteristics of healthy personality according to Carl Rogers is .......................... .

(A) Acceptance of Responsibility

(B) Competent and industrious

(C) Creative

(D) Ability to relate to others

34. Rahul failed in the terminal examination but he tried to keep his good performance in sports.

This is an example of .......................... type of defence mechanism.

(A) Compensation

(B) Identification

(C) Displacement

(D) Regression

32. प्रज्ञा ही चौथ्या इयत्तेतील प्रतिभावंत विद्यार्थिनी आहे. ती या वर्षी चौथी व पाचवीचा अभ्यासक्रम एकदम पूर्ण करणार आहे. प्रज्ञाची शाळा प्रतिभावंत विद्यार्थ्यांसाठी .......................... उपक्रम राबवित आहे.

(A) समृद्ध अभ्यासक्रम

(B) गतिमान (Acceleration)

(C) अभ्यासक्रम संक्षिप्तीकरण

(D) क्षमतानुरूप वर्गीकरण

33. कार्ल रॉजर्स यांच्या मते निकोप व्यक्तिमत्वाचे .......................... हे वैशिष्ट्य आहे.

(A) जबाबदारीची स्वीकार्यता

(B) सक्षम व उद्‌यमशील

(C) सृजनशील

(D) इतरांशी जुळवून घेण्याची क्षमता

34. राहुल सत्रांत परीक्षेत नापास झाला परंतु त्याने खेळामध्ये प्राविण्य राखण्याचा प्रयत्न केला. हे उदाहरण .......................... प्रकारच्या संरक्षण यंत्रणेचे आहे.

(A) प्रतिपूरण

(B) तादात्मिकरण

(C) विस्थापन

(D) परागमन

35. For most individuals intelligence increases upto the age of ................ .

(A) 20–25 years

(B) 16–20 years

(C) 10–15 years

(D) 0–5 years

36. The main assumption for guidance is .......................... .

(A) Interest

(B) Individual differences

(C) Aptitude

(D) Attitude

37. The .......................... method is used to collect data of the population in India.

(A) Census survey

(B) Developmental

(C) Case study

(D) Document analysis

38. In a questionnaire, the question, 'Give your opinion about your school cleanliness' is called .......................... type of question.

(A) Closed

(B) Open-ended

(C) Common

(D) Alternative

35. बहुतांश व्यक्तिंमध्ये बुद्धिमत्ता .................. वयापर्यन्त वाढते.

(A) 20–25 वर्षे

(B) 16–20 वर्षे

(C) 10–15 वर्षे

(D) 0–5 वर्षे

36. मार्गदर्शनासाठीचे .................. हे प्रमुख गृहितक आहे.

(A) अभिरुची

(B) व्यक्तिभेद

(C) अभियोग्यता

(D) अभिवृत्ती

37. भारतातील लोकसंख्येविषयी माहिती संकलित करण्यासाठी ...................... पद्धती वापरली जाते.

(A) जनगणना सर्वेक्षण

(B) विकासात्मक

(C) व्यक्ती-अभ्यास

(D) दस्तऐवज विश्लेषण

38. प्रश्नावलीमधील 'तुमच्या शाळेतील स्वच्छतेबद्दल तुमचे मत सांगा' अशा प्रकारच्या प्रश्नाला ......................... प्रश्न असे म्हणतात.

(A) बद्ध

(B) मुक्त

(C) सामाईक

(D) पर्यायी

39. To study the poor performance of some students in a particular classroom, the teacher undertakes .......................... research.
    (A) Developmental
    (B) Fundamental
    (C) Action research
    (D) Applied
40. The .......................... definition in a research gives the meaning of the variable with reference to the particular research.
    (A) Operational
    (B) Common
    (C) Conceptual
    (D) Nominal
41. Case study research involves .......................... .
    (A) Diagnostic method
    (B) Survey method
    (C) Experimental method
    (D) Historical method
42. Good quality .......................... in all fields is directly related to the development of the nation.
    (A) Administration
    (B) Teaching
    (C) Research
    (D) Communication

39. एका विशिष्ट वर्गातील काही विद्यार्थ्यांच्या कमी कार्यमानाचा अभ्यास करावयाचा आहे; तर शिक्षक ................. संशोधन हाती घेईल.
    (A) विकासात्मक
    (B) मूलभूत
    (C) कृतीसंशोधन
    (D) उपयोजित
40. एखाद्या विशिष्ट संशोधनाच्या संदर्भात, संशोधनातील चलांचा अर्थ म्हणजे ............. व्याख्या होय.
    (A) कार्यात्मक
    (B) सर्वसाधारण
    (C) संकल्पनात्मक
    (D) नामदर्शक (नॉमिनल)
41. व्यक्ती अभ्यासमध्ये .................. चा समावेश होतो.
    (A) निदानात्मक पद्धती
    (B) सर्वेक्षण पद्धती
    (C) प्रायोगिक पद्धती
    (D) ऐतिहासिक पद्धती
42. सर्वक्षेत्रातील चांगल्या प्रतीचे .................... हे देशाच्या विकासासाठी प्रत्यक्ष संबंधित असते.
    (A) प्रशासन
    (B) अध्यापन
    (C) संशोधन
    (D) संप्रेषण

43. If a constant is added to a raw score series, then which of the following will be *true* ?

(1) Mean of the series remains same

(2) Mean of the series gets changed by the constant value

(3) Standard deviation of the series remains same

(4) Standard deviation of the series gets changed by the constant value

(A) Statements (1) and (4) are true

(B) Statements (2) and (3) are true

(C) Statements (2) and (4) are true

(D) Statements (1) and (3) are true

44. Hypothesis means ...................... .

(A) A statement regarding conclusion

(B) A tentative statement about the solution of a problem

(C) A statement showing aim of research

(D) A statement based on previous researches

43. जर कच्च्या प्राप्तांकाच्या श्रेणीत एक स्थिरांक मिळविला तर खालीलपैकी कोणते **सत्य** आहे ?

(1) श्रेणीचे मध्यमान आहे तेच राहील

(2) श्रेणीचे मध्यमान स्थिरांकाच्या किंमतीएवढे बदलेल

(3) श्रेणीचे प्रमाण विचलन आहे तेच राहिल

(4) श्रेणीचे प्रमाण विचलन स्थिरांकाच्या किंमतीएवढे बदलेल

(A) विधाने (1) व (4) सत्य आहेत

(B) विधाने (2) व (3) सत्य आहेत

(C) विधाने (2) व (4) सत्य आहेत

(D) विधाने (1) व (3) सत्य आहेत

44. परिकल्पना म्हणजे .......................... .

(A) निष्कर्षासंदर्भातील विधान

(B) समस्येच्या निराकरणाबाबत तात्पुरते विधान

(C) संशोधनाचे ध्येय दर्शविणारे विधान

(D) पूर्व संशोधनावर आधारित विधान

45. Non-parametric tests are applied to ...................... scaled data.

(A) Nominal and ratio

(B) Ratio and ordinal

(C) Ordinal and nominal

(D) Interval and ratio

46. 'You want to study the combined relationship of students' home environment and school environment with their adjustment problems.' Which technique can be used for data analysis ?

(A) Multiple correlation

(B) Biserial correlation

(C) Partial correlation

(D) Spearman's correlation

47. ........................ is a non-probability sampling technique.

(A) Simple random sampling

(B) Multi-stage random sampling

(C) Snowball sampling

(D) Multi-phase sampling

45. ............................ शलाका (स्केल) वरील माहितीला अपरिमितीय कसोट्या लावता येतात.

(A) नामांकन आणि गुणोत्तर

(B) गुणोत्तर आणि क्रमांकन

(C) क्रमांकन आणि नामांकन

(D) अंतर आणि गुणोत्तर

46. तुम्हाला विद्यार्थ्यांच्या समायोजन समस्येचा त्यांच्या गृहवातावरण व शालेय वातावरणाशी संयुक्त संबंधाचा करावयाचा आहे. त्यासाठी माहिती विश्लेषणासाठी खालीलपैकी कोणते तंत्र उपयुक्त ठरेल ?

(A) बहुविध सहसंबंध

(B) द्विश्रेणीक सहसंबंध

(C) अंशत: सहसंबंध

(D) स्पिअरमॅनचा सहसंबंध

47. .......................... हे असंभाव्यतेवर आधारित न्यादर्श-निवड तंत्र आहे.

(A) सुगम यादृच्छिक पद्धती

(B) बहुस्तरीय यादृच्छिक पद्धती

(C) स्नो-बॉल पद्धती

(D) बहु-अवस्था पद्धती

48. Which of the following is *not* a tool of research ?

(A) Questionnaire

(B) Attitude scale

(C) Interview

(D) Inventory

49. In a quantitative research, a good sample should be ........................... .

(A) Less than 20 in size

(B) Randomly selected

(C) Homogeneous

(D) Selected using incidental sampling technique

50. You want to study how Pune University evolved since its establishment. Which of the following method will be useful for this study ?

(A) Causal comparative

(B) Descriptive

(C) Developmental

(D) Historical

48. खालीलपैकी कोणते संशोधनाचे साधन **नाही** ?

(A) प्रश्नावली

(B) अभिवृत्ती मापनश्रेणी

(C) मुलाखत

(D) शोधिका

49. संख्यात्मक संशोधनामध्ये .......................... चांगला न्यादर्श ठरेल.

(A) 20 पेक्षा कमी आकाराचा

(B) यादृच्छिकपणे निवडलेला

(C) एकजिनसी

(D) प्रासंगिक न्यादर्श निवड पद्धतीने निवडलेला

50. पुणे विद्यापीठाच्या स्थापनेपासून विद्यापीठाचा विकासाचा अभ्यास करावयाचा असेल. तर .................................... ही पद्धती उपयुक्त ठरेल.

(A) कारणमिमांसा तुलनात्मक पद्धती

(B) वर्णनात्मक

(C) विकासात्मक

(D) ऐतिहासिक

ROUGH WORK